International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# आदिवासी आत्मकथन : सांस्कृतिक संघर्षाचे प्रतिबिंब

**प्रा. अंकुश माणिक सोनुने**

*सहायक प्राध्यापक ,मराठी विभाग, शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर नगरपालिका कला,दा.ज.मालपाणी व ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) संगमनेर, जि.अहिल्यानगर.*

*Corresponding Author –* **प्रा.अंकुश माणिक सोनुने**

**DOI - 10.5281/zenodo.20486086**

**प्रस्तावना:**

साहित्य हे खऱ्याअर्थाने समाजाचा आरसा आहे.समाजाची जातीय व्यवस्था धार्मिक बंधणे या साऱ्याच गोष्टींचा उलगडा हा साहित्यात होत असतो. आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे संवर्धन करणारे आहे.आदिवासींचे परंपरागत जीवन अत्यंत साधे सरळ आहे. निसर्गाचा आनंद घेत त्यांच्या आशा आणि अपेक्षा मोजक्याच प्रमाणात आहे. जल,जमीन, जंगल इतकाच त्यांचा संबंध आहे.आदिवासी समाजात एकमेकांबद्दल आदर आणि प्रेमाची भावना आहे. आदिवासींच्या वाड्या,वस्त्या एकाच गटाने आणि जमातीने वसलेल्या आहेत.त्यांच्यामध्ये परस्परांविषयी सहकार्याची भावना दिसून येते.एकमेकांच्या सुख, दु:खामध्ये सहभागी होण्याची एकमेकांस समजुन घेण्याची त्यांची वृत्ती आहे. जातपंचायतीला आदिवासी प्रमाण मानतात. आपल्या साध्या सरळ जीवन पद्धतीत रमणारा हा आदिवासी समाज आहे. आदिवासी साहित्यामध्ये प्रामुख्याने आदिवासी लोकांनी मराठीत सर्वप्रथम आदिवासी जीवन आणले, कुतूहल, जिज्ञासा आश्चर्य यामधून हे साहित्य निर्माण झाले आहे.

आदिवासी समाज घटकाला आपली सांस्कृतिक ओळख टिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागला आहे.या शोधनिबंधात आदिवासींचे सांस्कृतिक योगदान व सामाजिक योगदान या विषयावर विवेचन करण्यात येणार आहे.

**आदिवासी आत्मकथनाची पार्श्वभूमी :**

मराठी साहित्यामध्ये आत्मकथन हा साहित्यप्रकार प्रथम दलित साहित्यातून उदयाला आलेला दिसून येतो. दलित साहित्यातील "बलुत" दया पवार यांचे प्रथम आत्मकथन उदयाला आलेले आहे .परंतु प्र.ई.सोनकांबळे यांचे "आठवणींचे पक्षी" ह्या आत्मकथनातील काही लेख अस्मितादर्श या नियतकालिकात प्रकाशित झालेले आढळतात . आत्मकथनात **"आदोर"** हे नजुबाई गावित यांच आदिवासी आत्मकथनातील प्रथम आत्मकथन आहे.आदिवासी आत्मकथनांमध्ये प्रामुख्याने जीवन जगण्याचा संघर्ष, वेदना दु:ख, सोबतच इथल्या व्यवस्थेने केलेली पिळवणूक या साऱ्यांशी संघर्ष दिसून येतो. आदिवासी आत्मकथनांमधील संघर्ष हा कोणा एका व्यक्तीचा नसून संपूर्ण समाजाचा आहे. आजही आदिवासी समाज डोंगरदऱ्यात आपले जीवन वास्तव्याला आहे, जल,जंगल, जमीन यासाठी त्यांचा संघर्ष आजही चालू आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे उलटून गेली असली तरी आदिवासींच्या जगण्यात फारसा बदल झालेला आढळत नाही. त्यांना मूलभूत सुविधा आजही मिळालेल्या नाही आहे; आजही आदिवासी समाजामध्ये भीतीचे

वातावरण आहे. आदिवासींना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी इथल्या व्यवस्थेला तोंड द्यावं लागत आहे. आदिवासींचे हे भीषण दुःख साहित्याच्या माध्यमातून आदिवासी लेखक मांडताना दिसतात.आदिवासी हे पूर्वीपासून जरी जीवन वास्तव्याला असले तरी; त्यांनी त्यांची मूळ परंपरा,संस्कृती सोडलेली नाही, त्याचे जतन केले आहे. त्यामुळेच आदिवासी संस्कृती ही वेगळी आहे. आदिवासी समाज हा पूर्वीपासून रानावनात, डोंगरकपारी,जंगलामध्ये जीवन वास्तव्याला आहे. त्यांचे संपूर्ण जीवन हे जल, जंगल, जमीन या भोवतालीच फिरताना दिसतो.पूर्वी आदिवासींचे राज्य होते, कित्येक राजे हे आदिवासी साम्राज्याचे मालक होते. परंतु परकिय अक्रमानाने त्यांचे राज्य संपुष्टात येत गेले. जंगलावर अतिक्रमण झाल्यामुळे आदिवासी समाज हा वनवासी बनला आणि अन्न, पाण्यासाठी भटकू लागला.

मराठी साहित्यात १९६० पासून अनेक साहित्यप्रवाह उदयाला आले. त्यामध्ये ग्रामीण, दलित, भटक्या विमुक्त समाजाबरोबर आदिवासी जीवनाचे चित्रण देखील साहित्यात यायला लागले. याच काळामध्ये सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक चळवळी देखील उदयाला आल्या आणि त्या चळवळी स्थिर झाल्या. त्याचाच परिणाम म्हणून आदिवासी हा देखील स्वतंत्र साहित्यआहे.अशा स्वरूपात बिरसा मुंडा यांनी आदिवासींना लढण्यासाठी बळ दिले. आदिवासीना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी आपले आयुष्य पणाला लावणारे बिरसा मुंडा हे आदिवासींना लढण्यासाठी प्रेरणा ठरले.आदिवासी समाजाचे दु:ख सर्वप्रथम साहित्याच्या माध्यमातून मांडण्याचे कार्य महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड 'या पुस्तकाच्या माध्यमातून केले.शेतकऱ्यांच्या दु:खासोबत त्यांनी आदिवासींचेही त्यात वर्णन केले , आणि आदिवासी समाजातील सामान्य समाज घटकाला न्याय मिळावून देण्यासाठी साहित्याच्या माध्यमातून त्यांनी वाच्या फोडली.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे दलित, आदिवासी समाज घटकांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाल्यामुळे,त्यांना स्व-अस्तित्वाताची जाणीव होऊन आत्मभान आले, आणि त्यांना गुलामगिरीची, आपल्याला मिळालेल्या हिनतेच्या वागवणूकीची , अन्याय, अत्याचार , मिळालेलं दुःख सांगायला सुरुवात करुन लेखनही करु लागले आणि आपले दुःख साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करायला लागले.आदिवासी साहित्यामध्ये आदिम जीवनाचे चित्रण आले आहे. त्यामध्ये आदिवासींच्या रूढी,परंपरा, संस्कृती सोबतच त्यांची जीवन जगण्याची कला, सामाजिक एकोपा, कुटुंब व्यवस्था , स्त्री-पुरुष संबंध आणि त्यांचे निसर्गाशी असलेले अतूट नाते त्यात आले आहे. आदिवासी साहित्यातून आदिवासींवर होणारा अन्याय, अत्याचार ,गुलामगिरी सोबतच त्यांना मिळालेली हीनतेची वागणूक या गोष्टी आदिवासी साहित्यप्रकारातून मांडण्यात आलेल्या आहेत.

आदिवासी आत्मकथनातील सांस्कृतिक संघर्ष समजून घेण्यासाठी आपल्याला खालील प्रमाणे काही निवडक आत्मकथनाचा विचार करावा लागतो .

१) **मी एक स्वप्न पाहिलं!** "भिल्ल" या आदिवासी जमातीत राजेंद्र भारूड यांचा जन्म झालेला आहे,आणि बालपणीच वडिलांच छत्र हरवलेलं असून सुध्दा प्रशासकीय सेवेत जिल्हाधिकारी या पदावर सध्या कार्यरत असलेल्या राजेंद्र भारूड यांच 'मी एक स्वप्न पाहिलं'! या आत्मकथनाच्या रुपाने त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास हा आदिवासी समाजाला प्रेरणा देणारा आहे .तसेच या समाजातील उच्च स्वप्न बघू इच्छिणाऱ्या आणि आपल्या स्वप्नासाठी सतत धडपड करणाऱ्या तरूणाईला आपल्या आयुष्याची लढाई लढण्यासाठी नवसंजीवनी देणारा जीवनपट आहे.

आयुष्यात कितीही संकटे आली तरी त्याला दोन हात करण्यासाठी जिद्द आणि प्रचंड इच्छाशक्ती , असेल तर आपल्याला कोणीही हरवू शकत नाही ,अशा स्वरूपाचा एक आत्मविश्वास राजेंद्र भारूड यांच्या आत्मकथनाच्या रूपाने दिसतो.गरिबी ही कोणत्याही परिस्थितीत अडथळा ठरू शकत नाही.राजेंद्र भारुड यांनी आपल्या आदिवासी समाजातील सामाजिक परिस्थितीबद्दल, अनुभवाबद्दल देखील मांडणी केली आहे.धुळे जिल्ह्यातील साक्री हा राजेंद्र भारूडांचा तालुका आहे. आदिवासी समाज ज्या कठीण परिस्थितीत जीवन जगतो आहे. ते भीषण वास्तव आहे

२) **चोरटा:** चोरटा' हे संतोष देवराम पवार या फासेपारधी जमातीत जन्मलेल्या तरुणाचे आत्मकथन आहे. बारावीपर्यंत शिक्षण घेऊन आपल्या जातीचं दुःख हे जगासमोर मांडावे ह्या हेतूने संतोष पवार यांनी चोरटा हे आत्मकथन लिहिले आहे. संतोष पवार यांचे वडील देवराम आणि आई नमा यांचा जीवनपट या आत्मकथनाच्या रूपाने उलगडला गेला आहे. खऱ्या अर्थाने फासेपारधी या जमातीत जन्म घेतलेल्या आणि जीवन जगत असताना आपल्या वाट्याला आलेले विविध दुःख या आत्मकथनाच्या रूपाने इतरांना कळावे या सामाजिक हेतूपोटी लेखक आपले लिखाण करताना दिसतो. केवळ आपल्या पोटाची खळगी भागवण्यासाठी चोरी करावी लागते आणि केलेली चोरी ही पचवावी देखील लागते.लेखकाची आई 'नमा' देखील कधी कधी चोरी करायची याविषयी लेखक सांगतो की आमच्या फासेपारधी जमातीत चोरी करण्याची सवय लागलेली असते,त्यामुळे इथे प्रत्येक जन चोरी करायला मोकळा. नवऱ्यांची काळजी सतत नामाला लागलेली असते, ती म्हणते रात्री चोरी करताना जरा सांभाळून जात जावा. आणि स्वतःची काळजी घेत जावा. फासेपारधी आदिवासी जमातीमध्ये त्यांना चोरी सांभाळून करण्यासाठी स्त्रीया सतत सल्ला देतात. फासेपारधी या समाजामध्ये मुलगा चोरी करायला शिकला ,म्हणजेच त्याचे लग्न केल्या जाते. कारण तो सक्षम आहे,त्याचे कुटुंब सांभाळायला. चोरी जर घावली नाही तर कित्येक वेळा त्यांना उपासमारीची वेळ सुद्धा येते. चोर म्हटल्यावर कोणीही त्यांना काम देत नाही, त्यांना कामावर देखील कोणी ठेवत नाही . चोरटा या आत्मकथनाच्या माध्यमातून संतोष पवार यांनी अशा प्रकारचे विदारक वास्तव समाजापुढे मांडले आहे.

३) **आकांत:** आदिवासी आत्मकथनकार बाबाराव मडावी यांनी भारतीय समाजाला जागृत ठेवण्यासाठी साहित्याचा वापर प्रामुख्याने केलेला दिसतो.'आकांत' चा शब्दशः अर्थ किलबिलाट,टाहो, गोंधळ असा आहे.बाबाराव मडावी यांनी आपल्या दु:खाचा टाहो आकांत या आत्मकथनाच्या रूपाने जगासमोर ठेवला आहे.आदिवासी समाजाला शैक्षणिक अधिकार मिळवून देण्यासाठी बाबाराव मडावी यांनी इथल्या व्यवस्थेशी सतत संघर्ष करावा लागला आहे.कारण आदिवासी समाज हा शैक्षणिक दृष्ट्या अतिमागास म्हणून समजला गेलेला आहे.भारतीय समाज व्यवस्था ही वर्णभेदी स्वरूपाची आहे.त्यात उच्च,निच्चता आहे.आकांत हे आत्मकथन फक्त बाबाराव मडावी यांचं दु:ख नाही तर ते सर्व आदिवासी समाजाचं दु:ख आहे.ते सर्व आदिवासी समाजाला प्रेरणा देणारं दस्तऐवज आहे.आदिवासी समाजामध्ये जीवन जगत असताना बाबाराव मडावी यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला आहे.परंतू त्यांच्यातील जिद्द, मेहनत, प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी आपले सामर्थ्य निर्माण केलेआहे.आयुष्यात कधीच हार

मानली नाही,दोन वेळच्या जेवणासाठी त्यांची तारांबळ होत होती.उपाशी पोटी कधी कधी त्यांना रडु कोसळायचे तरी देखील ते आपल्या वेदना सहन करत राहिले, आणि स्वतः ला सावरत राहिले.आणि नेहमी आशावादी राहत गेले.आदिवासी समाजाबद्दल बाबाराव मडावी यांनी विस्तृत असे विश्लेषण केलेले आहे,आदिवासी समाजातील बोली, संस्कृती, राहणीमान, नात्यातील गोडवा, जगण्याचा निर्मळपणा ,जल जंगल,जमीन याबद्दल असणारी आत्मियता त्यांनी डोळसपणे मांडली आहे.

या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सुध्दा आदिवासी समाजातील अंधश्रद्धा, पारंपारिकता कायम आहे.येथील सामाजिक व्यवस्थेत एकोपा निर्माण करण्यामागे आदिवासी समाजजीवनाचा फार मोठा वाटा आहे.भविष्यामध्ये कोणतही नैसर्गिक संकट निर्माण होऊ नये म्हणून नैसर्गाचे पुजन,जतन हा समाज करतो.या आत्मकथनात कुष्ठरोगाने पिडित असणाऱ्या व्यक्तींच जीवन सुध्दा लेखकाने आपल्या लेखणीतून साकारलेलं आहे.त्यांना जीवन जगण्यासाठी नवीन उभारी देण्याचं काम बाबाराव मडावी करतात.

'परधान' या आदिवासी जमातीमध्ये बाबाराव मडावी यांचा जन्म आहे. त्यांनी चळवळीत केलेले कार्य आणि गरिबीचे व दारिद्र्याचे चटके सहन करत जगणाऱ्या समाजाचे जीवन चित्रण बाबाराव मडावी यांनी केले आहे. आकांत या आत्मकथना विषयी यशवंत मनोहर यांनी आंबेडकरवादी मराठी साहित्य या ग्रंथात म्हटले आहे. मूळनिवासी असणाऱ्या आदिवासी जमातीचे ज्वलंत चित्रण या आत्मकथनात असून आदिवासी जीवनाची होणारी घुसमट यातून दिसून येते, बाबाराव मडावी यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेताना त्यांना विविध प्रकारचे मित्र भेटले. त्यात काही गरीब, श्रीमंत होते. त्यांच्यातील परस्पर सहकार्याच्या भावनेमुळेच लेखकाला आपले शिक्षण पूर्ण करता आले.आई सतत आजारी असल्यामुळे घरातील सर्व कामे लेखक व त्यांचा भाऊ माधव यांनाच करावी लागत होती. याचबरोबर दोन पैसे मिळवण्यासाठी लेखक खंतिच्या कामावर जात असे याविषयी गावातील लोकांच्या विविध प्रतिक्रिया येत होत्या. लोक म्हणत, "बाबा तू एवढा अन खंती खोदतं का रं ? लेखक म्हणतो की, "आपली शिक्षणव्यवस्था माणसाला बेकार आणि बरबाद करणारी आहे. सुशिक्षिताला कामधंदा मिळण्याइतपत ती सक्षम नाही. लेखकाचे ज्यावेळी कॉलेज सुरू होते त्यावेळी त्याचा संघर्ष हा भयानक अशा परिस्थितीवर मात करणारा होता.आपल्या शेतात विहिरीला पाणी लावावे म्हणून माणसाचा बळी देणारे लोक व बळी माणसाच्या रक्ताचे खिळे शेतात टोचावे. त्यामुळे पाणी येते असा समज चंद्रपूर जिल्ह्यातील भामरागड येथील आदिवासींमध्ये आहे.

**निष्कर्ष:**

१) आदिवासी आत्मकथन हे मराठी साहित्यातील अत्यंत महत्त्वाचे आणि प्रभावी साहित्य मानले जाते. या आत्मकथनांमधून आदिवासी समाजाचे वास्तव जीवन, त्यांचे दुःख, संघर्ष, परंपरा, संस्कृती आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते स्पष्टपणे समोर येते. आदिवासी समाज हा जल, जंगल आणि जमीन यांच्यावर आधारित जीवन जगणारा असून त्यांच्या जीवनपद्धतीत साधेपणा, परस्पर सहकार्य आणि सामाजिक एकोपा दिसून येतो.

२) आदिवासी आत्मकथनांमध्ये केवळ वैयक्तिक अनुभव नसून संपूर्ण समाजाचे दुःख आणि संघर्ष प्रतिबिंबित होतात. शिक्षणाचा अभाव, गरिबी, सामाजिक उपेक्षा, अन्याय आणि व्यवस्थेने केलेली पिळवणूक या समस्यांचा प्रभावी उल्लेख या साहित्यप्रकारात

आढळतो. तरीदेखील या सर्व अडचणींवर मात करून आदिवासी समाज आपली संस्कृती, परंपरा आणि ओळख टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

३) राजेंद्र भारूड यांचे ***"मी एक स्वप्न पाहिलं!",*** संतोष पवार यांचे ***"चोरटा"*** आणि बाबाराव मडावी यांचे ***"आकांत"*** ही आत्मकथने आदिवासी जीवनातील सांस्कृतिक संघर्षाचे जिवंत चित्रण करतात. या आत्मकथनांमधून आदिवासी समाजातील शिक्षणासाठीचा संघर्ष, सामाजिक अन्यायाविरुद्धची झुंज आणि स्वतःची ओळख निर्माण करण्याची धडपड स्पष्ट होते.

म्हणूनच आदिवासी आत्मकथन हे केवळ साहित्य नसून ते आदिवासी समाजाच्या जीवनाचे वास्तव दस्तऐवज आहेत. या साहित्यामुळे समाजाला आदिवासींच्या समस्या, त्यांचे संघर्ष आणि त्यांचे सांस्कृतिक योगदान यांची जाणीव होते. आदिवासी समाजाच्या विकासासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या जाणीवेकरिता या साहित्यप्रकाराचे महत्त्व अत्यंत मोलाचे आहे.

**संदर्भ:**

१) तुमराम विनायक: आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा , विजय प्रकाशन, नागपूर,प्रथम आवृत्ती १९९४.

२) भारुड राजेंद्र : मी एक स्वप्न पाहिलं!,दीपस्तंभ पब्लिकेशन ,जळगाव .

३) पवार संतोष: पारध्यांची जात पंचायत, समीक्षा पब्लिकेशन पंढरपूर.

आवृत्ती तिसरी २४ ऑक्टोबर,२०२१.पृष्ठ. क्र.५ ते ६४.

४) पवार संतोष: चोरटा (आत्मकथन ) समीक्षा पब्लिकेशन पंढरपूर.

५) देसाई संभाजी :आदिवासी समाज ,प्रशांत पब्लिकेशन ,जळगाव . पृष्ठ. क्र.१११.

६) मडावी बाबाराव :आकांत ,सुधीर प्रकाशन ,वर्धाप्रथम १९९८ . पृष्ठ. क्र.१६ ते १६८ मधील सारांश .